

परिसंवाद

# डिजिटल माध्यम वापरल्यास वाचनसंस्कृती वाढेल!

अनुपमा गुंडे

**ठाणे, दि.२७ -** आजची तरुणाई वापरत असलेल्या डिजिटल माध्यमातून साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचविल्यास वाचनसंस्कृती निश्चित वाढेल आणि मराठी भाषा टिकेल, असा विश्वास बुक गंगा डॉट कॉमचे मंदार जोगळेकर यांनी व्यक्त केला.

पी. सावळराम सभामंडपात 'संवाद तंत्रज्ञानाचा मराठी लेखनकलेवर होणार परिणाम' या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विज्ञान लेखक निरंजन घाटे होते. लेखक राजीव तांबे, ज्येष्ठ पत्रकार समीरण वाळवेकर, यमाजी मालकर यांनीही परिसंवादात मते व्यक्त केली.

तंत्रज्ञान आणि साहित्याची सांगड घातल्यास नव्या पिढीला निश्चितच फायदा होईल. अनेक चांगल्या साहित्यिकांची पुस्तके प्रकाशकाअभावी प्रकाशित होऊ शकत नाहीत, त्यांना ई-बुक हे चांगले माध्यम असल्याचे मत जोगळेकर यांनी व्यक्त केले. प्रिंटींगचा खर्च वाचेल, शिवाय विशिष्ट 'कोड'च्या वापरातून पुस्तकांची पायरसी रोखता येईल, असे ते म्हणाले. डिजिटल पुस्तकांसाठी आवश्यक 'डिव्हाईस' शासनाने शाळांमधून पोहोचविण्याचे काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

■ परिसंवादाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके अनुपस्थित होते. ऐनवेळी, निरंजन घाटे यांना परिसंवादाचे अध्यक्षस्थान देण्यात आले. परिसंवादाला अगदी ५०-६० श्रोतेच उपस्थित होते.

संवाद तंत्रज्ञानामुळे लेखन कलेवर विपरीत परिणाम होणार नाही, उलट देवघेव आणि अभिसरण व्हायला मदत होईल, असे मत ज्येष्ठ पत्रकार समीरण वाळवेकर यांनी व्यक्त केले. जगातल्या आठ हजार भाषांमध्ये मराठी भाषा पंधराव्या स्थानावर आहे. पण, मराठी अस्मिता, अभिमानाविषयी बोलणारे संगणकाविषयी स्वतंत्र दालन निर्माण करणार आहेत का, संगणक व्यवहार हे विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहणार आहे का, असे सवाल यमाजी मालकर यांनी केले.

आजच्या वेब लँग्वेजच्या पिढीशी आपल्याला जुळवून घ्यायचे आहे, हे अनेक उदाहरणांसह राजीव तांबे यांनी सांगितले. नव्या पिढीच्या भाषेशी जुळवून घेतल्याने भाषेवर परिणाम होणार नाही. फेस बुक, ऑर्कुट यामुळे आजची पिढी दडपणाशिवाय लिहिते आहे, माहिती शोधण्यासाठी आणि वाटून (शेअरिंग) घेण्यासाठी ही पिढी लेखन करते आहे. आज ते बाल्यावस्थेत आहे. भविष्यात ते चांगला आकार घेईल, असा विश्वास तांबे यांनी व्यक्त केला आहे.

ग्रामीण भागापर्यंत हे तंत्रज्ञान कसे पोहोचणार, असा प्रश्न निरंजन घाटे यांनी विचारला. आजच्या तंत्रज्ञानाच्या कुठल्याही प्रकारात लिहिले तरी त्यांचे संपादन होणार कसे, कारण चांगले संपादक लाभल्यास लेखक चांगला घडतो, असे मतही त्यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन घारपुरे यांनी केले. संमेलनाचे प्रसिद्धिप्रमुख विद्याधर वालावलकर यांनी स्वागत केले.